# चित्रपट महोत्सवांमध्ये सृजनशीलता आणि प्रादेशिक चित्रपटांना महत्त्व

## ‘पिफ’च्या निवड समिती सदस्यांचे मत

पुणे, दि. १७ फेब्रुवारी २०२५ : चित्रपट महोत्सवांमध्ये सृजनशीलता आणि प्रादेशिक चित्रपटांना महत्त्व मिळत असल्याने ओटीटी आले असले तरी चित्रपट महोत्सवांचे महत्त्व कायम असल्याचे मत चित्रपट समीक्षक आणि पुणे चित्रपट महोत्सवाच्या निवड समितीचे सदस्यांनी व्यक्त केले. २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पीफ) मध्ये निवड समिती सदस्य मीना कर्णिक, अभिजीत देशपांडे आणि सैबल चटर्जी यांनी संवाद साधला.

मीना कर्णिक म्हणाल्या, “प्रेक्षक म्हणून चित्रपट पाहणे आणि समीक्षक म्हणून त्याचे मूल्यमापन करणे या दोन वेगळ्या पण पूरक भूमिका आहेत, पण दोन्हींचा समन्वय चित्रपटाची निवड करताना मात्र महत्त्वपूर्ण ठरतो. “ मीना कर्णिक यांनी मुंबई-पुण्याबाहेरील ग्रामीण भागातील नवोदित दिग्दर्शकांच्या सिनेमांच्या वाढत्या उपस्थितीबद्दल समाधान व्यक्त केले. यंदा ग्रामीण भागातील नव्या दिग्दर्शकांचे चित्रपट अधिक संख्येने आले आहेत, ही सकारात्मक बाब आहे आणि या वाढीत ‘पिफ’चा मोठा वाटा आहे. महिला-केंद्रित चित्रपटांच्या वाढत्या संख्येबद्दल त्या म्हणाल्या की महिलांचे मुद्दे प्रभावीपणे मांडतील आणि समाजाच्या जाणीवा विस्तारतील असे चित्रपट अधिक संख्येने यायला हवेत.

अभिजित देशपांडे यांनी चित्रपट महोत्सवांचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की,चित्रपट महोत्सव हे असे माध्यम आहे जिथे नवीन आणि चांगल्या धाटणीचे

सिनेमे पाहायला मिळतात, तसेच उत्कृष्ट कलाकृतींना योग्य स्थान मिळते. त्यांनी फँड्री आणि सैराट यासारख्या चित्रपटांचा उल्लेख करत, प्रादेशिक कथांना मिळणाऱ्या संधींवर प्रकाश टाकला. हे चित्रपट प्रादेशिक भाषेतील कथा कमी बजेटमध्ये, स्थानिक कलाकारांना सहभागी करूनही प्रभावीपणे मांडू शकतात, असे त्यांनी सांगितले. मराठी चित्रपट निवड प्रक्रियेबद्दल ते म्हणाले, की चित्रपटांची निवड करताना प्रादेशिकता, आशय, विषय आणि सिनेमातील वेगळेपण याला महत्त्व दिले जाते. तांत्रिक कच्चेपणा असला तरी प्रामाणिक असलेले चित्रपट निवडले जातात. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर कसा उभा राहतो, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. मराठी चित्रपटांची स्पर्धा आता केवळ भारतीय सिनेमांसोबतच नाही, तर इतरदेशांतील कलात्मक सिनेमांसोबतही होत आहे, असे ते म्हणाले.

सैबल चॅटर्जी यांनी आपले मत नोंदवताना सांगितले की आम्ही कुठल्याही बिग बजेट चित्रपटांना प्राधान्य देण्यापेक्षा कमी बजेटचे असले किंवा तांत्रिकदृष्ट्या जरी कमकुवत असले तरी शब्दांमध्ये तिथल्या मातीचा तिथल्या संस्कृतीचा तिथल्या भावनांचा समृद्धपणे चित्रीकरण करू शकणाऱ्या चित्रपटांनाच प्राधान्य देतो आणि प्रेक्षकांना भावतील अशाच कलाकृतींना प्राधान्य देण्याकडे आमचा कल असतो.

प्रादेशिक चित्रपटांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळण्यासाठी महोत्सव एक उत्तम मार्ग आहे. चांगली पटकथा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम सादरीकरण हेच यशस्वी होण्याचे प्रमुख घटक आहेत, असे चॅटर्जी यांनी सांगितले.

चित्रपट महोत्सव हे असे माध्यम आहे जिथे नवीन आणि चांगल्या धाटणीचे सिनेमे पाहायला मिळतात, तसेच उत्कृष्ट कलाकृतींना योग्य स्थान मिळते. चित्रपट महोत्सव केवळ सिनेमांच्या प्रदर्शनासाठी नसून त्यातून व्यापक सांस्कृतिक आणि कलात्मक प्रभाव अधोरेखित होतो. पिफ महोत्सवांमुळे

जागतिक चित्रपटसृष्टीत भारतीय प्रादेशिक चित्रपटांचा ठसा उमटत असून, प्रेक्षकांसाठीही हे एक अनोखे चित्रपटसंस्कृतीचे व्यासपीठ ठरत असल्याचे तिघांनीही सांगितले.